।। विद्या क्रियेन शोभते ।।
SHETH T. J. EDUCATION SOCIETY'S
**SHETH NANJIBHAI KHIMJIBHAI THAKKAR THANAWALA COLLÈGE OF COMMERCE &**
**SHETH JAYANTILAL TRIBHOVANDAS THANAWALA COLLEGE OF ARTS**
Kharkar Ali, Thane (W) - 400 601
A Linguistic Minority Institute, Recognized under 2(f) and 12(b) of the UGC act 1956
Tel.: 25431119, Website : www.nktdegreecollege.org Email:- nkttdg@yahoo.co.in

Re-Accredited by NAAC with CGPA 2.62, B+ Grade (3rd Cycle)
ISO 9001: 2015 Certified

Dr. DILIP M. PATIL
M.Sc. Ph.D.
PRINCIPAL

NKTT/MVM/2020-21/ 863 /

दिनांक-०८/०३/२०२१

प्रति,
विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण,
कोकण विभाग,
पनवेल

**विषय - मराठी भाषा गौरव दिन साजरा केल्याबद्दल**

**संदर्भ - पत्र क्र. विससं/ उशि/ कोविप/ मशि/ २०२१/३८२, दिनांक २२/०२/२०२१**

माननीय महोदय,

आपल्या वरील पत्राच्या अनुषंगाने आमच्या महाविद्यालयात जेष्ठ कवी वि. वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा दि. २७ फेब्रुवारी हा जन्मदिवस "मराठी भाषा गौरव दिन" म्हणून साजरा करण्यात आला. कोव्हीड १९ च्या पार्श्वभूमीवर केंद्र आणि राज्यशासनाच्या वेळोवेळी सूचनांप्रमाणे सर्व प्रतिबंधक उपायांचे पालन करून हा दिवस ऑनलाइन माध्यमातून साजरा करण्यात आला.

सदर कार्यक्रमाचा आणि त्याअंतर्गत साजरा केलेल्या मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याचा सखोल अहवाल आणि काही छायाचित्रे या पत्राबरोबर जोडत आहोत.

धन्यवाद.

आपले विश्वासू,

सौ. गीतांजली चिपळूणकर
समन्वयक, मराठी वाङ्मय मंडळ

डॉ. दिलीप पाटील
प्राचार्य

# मराठी भाषा गौरव दिन अहवाल

शेठ टी. जे. एज्युकेशन सोसायटीच्या शेठ एन. के. टी. टी. वाणिज्य महाविद्यालय आणि शेठ जे. टी. टी. कला महाविद्यालयाच्या मराठी वाङ्मय मंडळाने शनिवार दिनांक, २७ फेब्रुवारी २०२१ रोजी ऑनलाईन माध्यमातून मराठी भाषा गौरव दिन साजरा केला. हा कार्यक्रम गुगल मीट वर सकाळी ११.०० वाजता आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिलीप पाटील हे होते. ऑनलाईन माध्यमातून कार्यक्रम सुरु करण्याआधी महाविद्यालयाच्या ग्रंथालयामध्ये सरस्वती पूजन करण्यात आले. तसेच ज्ञानपीठ पुरस्कार विजेते जेष्ठ साहित्यिक वि. वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेची आणि त्यांच्या पुस्तकांची पूजा करण्यात आली. ऑनलाईन कार्यक्रमाची सुरुवात सर्वांच्या स्वागताने झाली. त्यानंतर महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. अपर्णा ठाकूर यांनी आपले मराठी भाषेविषयीचे प्रेम सुंदर अश्या शब्दात व्यक्त केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिलीप पाटील यांनी सुद्धा मराठी भाषेबद्दल मौल्यवान अशी माहिती देऊन विद्यार्थ्यांशी सुसंवाद साधला. शंकर गिन्हे नावाच्या तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्याने आपला मराठी भाषा संवर्धन पंधरवडा महाविद्यालयात कसा साजरा झाला याविषयीचा आपला अनुभव व्यक्त केला. त्यानंतर स्वरचित काव्य वाचन स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांनी आपल्या स्वलिखित कवितांचे वाचन केले. महाविद्यालयातील मराठी विषयाच्या सहाय्यक प्राध्यापिका सौ. सुमती कांबळे यांनी त्यांच्या भाषणातून मराठी भाषेचे सौंदर्य विद्यार्थ्यांना उलगडून दाखवले.

मराठी राजभाषा दिनाच्या निमित्ताने महाविद्यालयाने १३ फेब्रुवारी २०२१ ते २७ फेब्रुवारी २०२१ मध्ये मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा केला. या पंढरवड्यामध्ये महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसाठी आणि शिक्षकांसाठी अनेक स्पर्धांचे आणि कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. पंधरवड्याची सुरुवात सोमवार दिनांक, १५ फेब्रुवारी २०२१ रोजी डॉ. विमुक्ता राजे यांच्या अतिथी व्याख्यानाने झाली. त्यांनी संत साहित्य आणि आधुनिक काळ या विषयावर उत्तम असा संवाद साधला. त्यानंतर विद्यार्थ्यांसाठी बुधवार दिनांक, १७ फेब्रुवारी २०२१ रोजी पुस्तक पुनरावलोकन स्पर्धेचे आयोजन केले होते. त्यात मुलांनी अग्निपंख, श्यामची आई, मृत्युंजय, ताजमहाल, वडार वेदना, श्रीमान योगी, असा मी असा मी, ययाती, पसायदान, काय भुललासी इत्यादि. पुस्तकांचे पुनरावलोकन सुंदर पद्धतीने केले. शनिवार दिनांक, २० फेब्रुवारी २०२१ रोजी विद्यार्थ्यांसाठी स्वरचित काव्य वाचन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी सामाजिक विषय, निसर्ग, नाती, प्रेम, पाऊस इत्यादि विषयांवर आधारित स्वलिखित कविता सादर केल्या. २३ फेब्रुवारी रोजी निबंध

लेखन आणि कथा लेखनाच्या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. निबंधासाठी ऑनलाईन शिक्षणपद्धती - फायदे आणि तोटे, मराठी भाषेचे सौंदर्य आणि शिवकालीन गड किल्ल्यांचे महत्व असे विषय देण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी त्यांच्या कथा आणि निबंध लिहून महाविद्यालयाने दिलेल्या ई-मेल आय डी वर पाठवून दिले होते. बुधवार दिनांक, २४ फेब्रुवारी २०२१ रोजी विद्यार्थ्यांसाठी आणि शिक्षकांसाठी प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन केले होते ज्यामध्ये मराठी साहित्य, संतसाहित्य, महाराष्ट्रातील गडकिल्ले, महाराष्ट्रातील पर्यटन स्थळे, महाराष्ट्रातील प्रसिद्ध व्यक्तिमत्व इत्यादी विषयांवर प्रश्न विचारले गेले होते. गुगल फॉर्म द्वारे हि स्पर्धा घेण्यात आली होती. या स्पर्धेला भरभरून असा प्रतिसाद मिळाला. गुरुवार दिनांक, २५ फेब्रुवारी २०२१ रोजी सामाजिक विषयांशी निगडित असे दोन मराठी लघुपट (पारडं आणि चौकट) विद्यार्थ्यांना दाखविण्यात आले आणि त्यावर चर्चा केली गेली. या सर्व स्पर्धांचा निकाल मराठी भाषा गौरव दिनाच्या दिवशी जाहीर करण्यात आला. या सर्व स्पर्धांसाठी सौ.अरुंधती पत्की, सौ. प्रियांका मोरे, सौ. सुमती कांबळे आणि सौ. अदिती मोने यांनी परीक्षक म्हणून उत्तम कामगिरी बजावली. या संपूर्ण पंधरवड्याला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिलीप पाटील यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

सर्वात शेवटी महाविद्यालयाच्या सहयोगी प्राध्यापिका डॉ. धनश्री सावंत यांनी विद्यार्थ्यांना पसायदानाचा सखोल अर्थ समजावून दिला. कार्यक्रमाचा शेवट आभार प्रदर्शनाने करण्यात आला. मराठी वाङ्मय मंडळाच्या समन्वयक सौ. गीतांजली चिपळूणकर यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मराठी वाङ्मय मंडळाच्या सदस्या सौ. मैथिली केंडे यांनी केले.

सौ. गीतांजली चिपळूणकर
समन्वयक, मराठी वाङ्मय मंडळ

डॉ. दिलीप पाटील
प्राचार्य